## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :७२१/२०२१/अहमदनगर**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. विलास पाराजी गोंदकर,<br>रा. शिर्डी, विवेकानंदनगर,<br>ता.राहाता, जि. अहमदनगर-४२३१०९ | उप अधीक्षक ,<br>उप अधीक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालय,<br>राहाता. ता.राहाता,जि.अहमदनगर |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**सुनावणी दिनांक ३०/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक १४/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ३०/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १४/१०/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार कसलीही माहिती दिली नाही व आयोगाच्या आदेशाची पायमल्ली करुन आदेश झुगारुन लावला आहे.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक द्वितीय अपील क्रमांक २६४४/२०१९/अहमदनगर वरील निर्णय दिनांक ०९/०६/२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधीक्षक भूमी अभिलेख, राहाता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीत विद्यमान जन माहिती अधिकारी व इतर २ कर्मचाऱ्यांचे पथक गठित करुन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कार्यालयात शोध घ्यावा आणि उपलब्ध माहिती अपिलार्थीस त्यापुढील १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत पोचदेय डाकेने पाठवावे. तथापि, सदर माहितीबाबतचे अभिलेख आढळ न झाल्यास विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कागदपत्रे गहाळप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी याचेवर जबाबदारी निश्चित करुन तसे नोटराईज्ड शपथपत्र आयोगास सादर करावे.

४) सुनावणीपुर्वी प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही. त्यामुळे या तक्रारीची वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१) विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधीक्षक भूमी अभिलेख, राहाता, यांनी आयोगाने द्वितीय अपील क्रमांक २६४४/२०१९/अहमदनगर वरील निर्णय दिनांक ०९/०६/२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक २६४४/२०१९/अहमदनगर वरील निर्णय दिनांक ०९/०६/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाचे प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधीक्षक भूमी अभिलेख, राहाता, यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुद नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा दि. ०९/०६/२०२१ रोजी कार्यरत असणारे प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधीक्षक भूमी अभिलेख, राहाता, यांनी आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक ७२१/२०२१/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रत — माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालय, अहमदनगर, जि.अहमदनगर

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

जावक क्र. अपी-७५४ 28 MAR 2024